म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४५५५



# साधनिक अभंग.

हें पुस्तक

## साधु बाळुजी गणपत तेलंगे,

यांनीं तयार करून

छापून प्रसिद्ध केलें.

सन १९२५, आवृत्ति २ री.

किंमत १ आणा.

REFBK-0003170
REFBK-0003170



साधु बाळुजी गणपत तेलंगे.



REFBK-0003170
REFBK-0003170
3760

श्रीजगद्गुरुभ्यो नमः ।

# लेखकाचे दोन शब्द.

सत्यसंकल्पाचा दाता नारायण । तुकाराम.

**सनातन** हिंदुधर्माचे प्राचीन धार्मिक ग्रंथ अगणित असून शिवाय या भरतखंडांत श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास आणि तुकाराम आदिकरून अर्वाचीन श्रेष्ठ भगवद्भक्तांनीं जडमूढ मानवी प्राण्यांच्या आत्मोद्धाराप्रीत्यर्थ ओव्या, श्लोक आणि अभंग इत्यादिकांच्या रूपानें प्रचंड ग्रंथ रचून सत्यमार्गानुरोधानें निस्सीम भक्तिबलावर परमेश्वरप्राप्ती करून घेण्याविषयींच्या पारमार्थिक साधनांचें सांगोपांग विवरण जगापुढें मांडून ठेविलें आहे. अशा श्रेष्ठ साधुसंतांच्याच प्रसादानें मला सद्गुरूची भेट होऊन त्यांच्या कृपेनें अभंगरचनेची स्फूर्ती झाली. माझी जात मराठा असून संस्थान भोर तालुका सुधागडनजीक येथील मी रहिवासी आहें. माझें नांव बाळूजी, पित्याचें नांव

गणपत आणि मातेचें नांव सरस्वती व उपनांव तेलंगे. जन्मापासून परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्यानें बाळपणापासून देहकष्ट करून चरितार्थ करावा लागत आहे, यामुळें पूर्ववयांत विद्या मुळींच संपादन न होतां निरक्षर राहावें लागलें. शरीरकष्ट करूनच उदरपोषण करावें लागत असल्यानें अर्थातच ह्या भरतखंडांत ज्या शहरीं विशेषेंकरून शारीरिक कष्ट करणाऱ्यांना उदरनिर्वाहार्थ राहावें लागतें, अशा मुंबई शहरीं वयाच्या ३० व्या वर्षापासून मी राहात आहें. ह्या अवधींत देहक्षेत्राची पात्रता झाल्यावर सद्गुरूची गांठ पडून केवळ पुनर्जन्मच प्राप्त झाला आणि तेव्हांपासून साधुसंत हेच मायबाप असें प्रत्ययास आलें. बापाचा धंदा त्याचा मुलगा करूं लागतो, याप्रमाणें "भगवद्गुणवर्णन करणें" हाच जो संतांचा धंदा, तो करण्याची प्रेरणा या पुनर्जन्मामध्यें होऊन अमृत असें नामाभिधान प्राप्त झालें, म्हणून प्रत्येक अभंगाच्या शेवटच्या चरणामध्यें 'अमृत म्हणे' असें लिहिलेलें आहे. वर नमूद केलेंच आहे कीं, मला लिहिणें वाचणें मुळींच येत नसल्यानें केवळ सद्गुरु-कृपा-प्रसादानें स्वयंस्फूर्ती-पासून रचिलेल्या अभंगांच्या लेखनाचें काम बऱ्याचशा अपरिहार्य अडचणींमुळें फारच लांबणीवर पडलें होतें;

परंतु (भयकृत्-भयनाशनः) जो विघ्नें उत्पन्न करतो तोच शेवटीं सर्व विघ्नें नाहींशीं करून कल्याण करणारा असा भगवान् परमात्मा ह्यानेंच चतुर्वर्णश्रेष्ठ जे ब्राह्मण अशा एका ब्राह्मण व्यक्तीकडून सदरहू लेखनाचें कार्य करविलें. अमृत हा संतांचा विद्याहीन आणि अत्यंत अज्ञानी बालक आहे. तरी तुम्हीं वाचकांनीं मजवर कृपादृष्टी ठेऊन ह्या अभंग मालिकेमध्यें झालेल्या चुकांची क्षमा करावी. ह्या अभंग-रचनेंतील विवेचन परमेश्वरसंशोधनात्मक असून केवळ जगांतील **सत्यमार्ग**प्रदर्शक आहे. असें मार्मिक वाचकांस आढळून येईल. शेवटीं सकल जीवांच्या अंतर्यामीं वास करणाऱ्या भगवन्नारायणरूपी जगद्गुरूनें माझ्या मनांत असर्याद अशा जगाच्या विस्तीर्ण ज्ञानसागरामध्यें हा रचलेला अभंगरूपी जल बिंदू टाकून, अत्यंत सूक्ष्म प्रमाणानें इहकर्तव्य बजावण्याची प्रेरणा केली आणि सर्व साधनसामुग्री जुळवून देण्याची त्याची परिसमाप्ती करविली अशा त्या जगन्नियंत्या परमात्म्याचें अत्यंत आभारपूर्वक स्मरण करून वाचकांची रजा घेतों.

मिति वैशाख शुद्ध १<br>शके १८४३.

आपला नम्र,

**बाळूजी गणपत तेलंगे.**

प्रिन्टरः-रामचंद्र येसू शेडगे, निर्णयसागर प्रेस,
नं० २६-२८, कोलभाट लेन, मुंबई.

पब्लिशरः-साधु बाळुजी गणपत तेलंगे, श्रीदत्तमंदिर,
मु० पुगांव, जि० कुलाबा.

## पुस्तकें मिळण्याचा पत्ताः—

श्रीदत्तमंदिर, मु० पुगांव,
जि० कुलाबा, ता० रोहें,
पोस्ट कोलाड.

# सत्यधर्मसाधनिक अभंग

१

बाप माझा गणपती । माय नाम सरस्वती १
अमृत तयाचा हो सुत । दास चरणाचा अंकित २
सत्य गुरु नाम थोर । चौदा विद्यांचा सागर ३
भावें धरूनि मानसीं । शरण जावें तयापाशीं ४
सांगितलें सकळ मुळ । भुलूं नका हाचि बोल ५
शुद्ध पाळताती क्रिया । तेचि नर देवा प्रिया ६
दया ज्याचे सदा अंतरीं । जवळी वसे त्याचे हरी
ऐशा संता धरुनी करीं । फिरे तया बरोबरी ८
भक्तांघरीं काम करी । भवसागरांत तारी ९
अमृत ह्मणे देव सखा । पळमात्र विसरूं नका १०

२

हात जोडितों जातीसी । चारी वर्णांच्या लोकांसी
अधर्मे वागूं नका । सत्य धर्म सांडूं नका २
नरनारी जोडी निर्मुनी । ब्रह्मदेवाच्या मंत्रांनीं ३
तीच भार्या सत्य ह्मणा । इतर आई बहिणी जाणा
हाचि धर्म तुमचा ऐका । चारी वर्ण देवलोका ५
अमृत ह्मणे सर्व लोकां । हेंचि सत्कीर्तन ऐका ६

३

जनार्दन स्वामीराव । अवघे ह्मणती एक देव १
आणिक कल्पनेचे देव । कां हो धरितां द्वैतभाव २
करुनी दगडांचे देव । घेतां गरीबांचे जीव ३
अमृत ह्मणे हीच भूल । नर्कवासी होय कुळ ४

४

तुमचा देव तुह्मांपाशीं । करा तीर्थव्रत काशी १
देह सार्थक केल्यावर । होइल तीर्थांचें साधन २
देहरूपीं विश्वेश्वर । हीच काशी पूर्ण शोध ३

अमृत ह्मणे शोध करा । पाय सद्गुरूचे धरा ४

५

सर्व ज्ञानाचें जें ज्ञान । सत्यज्ञान नारायण १
करूं नका मिथ्या वाद । चित्तीं धरा समाधान २
भांबावले सर्व जीव । कळेनाही एक देव ३
ज्ञानकळा प्रकाशली । प्रकाशांत भूल झाली ४
अमृत अज्ञानी पामर । चित्तीं धरी नारायण ५

६

तीर्थ व्रत आहे कसें । गुरुपाशीं सदा वसें १
ज्याचे चित्तीं सत्य असे । त्यास अखंड एकादशी
गुरुओळख ज्याला झाली । त्यानें तीर्थें सर्व केलीं
गुरु नाहीं बारा सोळा । अखंड एकचि सांवळा ४
अमृत ह्मणे ऐका बापा । चारी वर्ण एक देखा ५

७

शास्त्रें वाचुनि गुरू झाले । खरें नाहीं ओळखिलें १
आत्मज्ञान नाहीं झालें । गुरु होऊनी बैसले २

गुरु झाले घरोघरीं। भुलविती जन सारी ३
ऐसे गुरू झाले पहा। अंतरीं पाप असे उभा ४
काढा अंतरींचा मळ। सत्य करा हो सकळ ५
अमृत ह्मणे खरें शोधा। सत्य गुरुचे चरण वंदा ६

८

दया क्षमा पूर्ण धरा। आपला धर्म साधन करा १
ज्याचे अंगीं नाहीं दया। तोचि दैत्य पूर्ण खरा २
दैत्य देवलोकीं आला। धर्म देवाचा बुडविला ३
जय नाहीं भ्रष्ट लोकां। तेणें अधर्म झाला देखा ४
अमृत ह्मणे शोध करा। पाय सद्गुरूचे धरा ५

९

ऐकाऐका सकळ जन। सत्य सांगतों ही खूण १
चक्रपाणी नारायण। तेथें लावा दृढ मन २
हेंचि प्रकाशाचें मूळ। व्यर्थ करूं नका भूल ३
अमृत रामनामीं ध्यान। अवघ्या कल्पना सोडून

१०

लहान मोठे तेही पाहें । पैसा सर्वां प्रिय आहे १
पैसा सामान्यही नाहीं । पैसा बहू मान आहे २
ज्यासी पैसा प्राप्त झाला । जग वंदिती तयाला ३
सर्व पैसा खरा दिसे । कोणी पाहीना सत्यास ४
जेथें द्रव्य लोभ नाहीं । तेथें पूर्ण सत्य आहे ५
आशा धनाचीहो केली । सत्याचीहो भूल झाली
अमृत ह्मणे ऐका बापा । सत्य विश्वास हा राखा

११

देव देउळें मातीचीं । सर्व ढोंगें पैशाचीं १
पैशासाठीं सर्व ढोंग । करुनी दाखविती सोंग २
मुळींच सत्य कांहीं नाहीं । अशा पैशामध्यें पाहीं
खेळ पैशासाठीं केला । व्यर्थ भुलविलें जगाला ४
देव जगाचे वेगळा । कोणी नाहीं हो पाहिला ५
ज्यानें सत्य साधन केला । त्यानें देव ओळखिला
अमृत ह्मणे ऐका बापा । ह्मणुन सत्या तुह्मीं जपा

१२

देव घरोघरीं केले । दगड घडवुनि बैसविले १
स्वरूपा दगड आणिले । देव ह्मणूनी मानिले २
तोचि देव खरा केला । बकरीं कोंबडीं देती त्याला
ऐसे प्रत्यक्ष जीव बापुडे । बळी देती दगडापुढें ४
ऐसे क्रियाभ्रष्ट जन । धर्म बुडविला जाण ५
अमृत ह्मणे शोध करा । पाय सद्गुरूचे धरा ६

१३

चरणीं ठेवुनीयां माथा । शरण आलों सद्गुरुनाथा
दान मागूं आलों तूतें । दया धर्म भक्तीतें २
चित्तीं सत्य प्रेम ठेवीं । सदा नारायण गाईं ३
अमृत ह्मणे नाम खरा । चित्तीं हाची प्रेम धरा ४

१४

बाप माझा जगदीश । त्यासी भक्तीचीही आस १
भाव भक्ताचा भुकेला । दास सेवकाचा झाला २
भक्तीसाठीं जग निर्मिलें । अनंत कोटी खेळ केले

अमृत ह्मणे आशा त्याला । भाव भक्तीची देवाला

१५

गुरु निर्गुण निराकार । नाहीं त्यासी अंत पार १
गुरु सत्वाचें घर । निर्मळ आंत बाहेर ॥ २ ॥
गुरु अवतार धरी । शरणागत भक्त तारी ३
गुरु सगुणरूप झाला । कोणी ओळखिना त्याला
नरदेहीं जन्मा यावें । गुरुसी त्यानें ओळखावें ५
गुरुनाम मुखें गाय । पाप दोष त्याचे जाय ६
ऐसा गुरूचा प्रताप । तोचि आहे मायबाप ७
सदा नारायण दिसे । दुजे ठायीं चित्त न वसे ८
अमृत ह्मणे शोध करा । पाय सद्गुरूचे धरा ९

१६

एक चित्तीं एक नेम । सदा देवाचें भजन १
हीच आमची सत्यपुजा।आणिक भाव नाहीं दुजा
तीर्थ व्रत नेम आम्रुचे । सदा नारायण वाचे ३
अमृत ह्मणे भाव धरा । नामस्मरण सदा करा ४

१७

आह्मां ज्ञान विद्या नाहीं। सत्य नाम घेतों पाहीं १
नाच करीतों सत्वाचा। सदा नामकीर्तनाचा २
नाहीं पैशासाठीं ढोंग। नव्हे भुलविणें जग ३
जनार्दनीं नाच केला। राहुनी मायेच्या वेगळा ४
नित्य मायेमध्यें राही। आशा धनाची हो नाहीं
अमृत ह्मणे केली आशा। शरण गेलों जगदीशा

१८

देह नाशिवंत आहे। त्यांत सत्य बीज राहे १
बीजापासुन जन्म झाला। जगीं रूपीं प्रकाशला
बीज चराचरीं वसे। जग तोचि आत्मा भासे ३
आत्मा तोचि देव खरा। नाहीं ओळख पाप्याला
जातिभेद वाढला। भ्रष्टपणानें हो झाला ॥५॥
अमृत ह्मणे शुद्ध राखा। भ्रष्टपणा करूं नका ६

१९

सूर्य एक आहे नभीं। अनंत कळा त्याच्या पाहीं

तैसा आत्मा बीज एक । राही सर्वांच्या देहांत २
पापकर्मीं बुद्धी रत । आत्मलाभ नाहीं होत ३
परी आत्मा जगीं एक । लीला दाखवी अनेक ४
कळा तयाच्या वेगळ्या । सर्व दिशीं प्रकाशल्या
अमृत ह्मणे पांडुरंग । व्यापियेलें त्यानें जग ६

२०

तालस्वर मुळींच नाहीं । अखंड सत्य नाम गाई
गुरुकृपा पूर्ण त्यास । सदा वैकुंठीं असे वास २
तेंचि पंढरपूर आहे । सत्य विठ्ठल तेथें राहे ३
ह्याच पंढरीस जावें । पूर्ण विरक्त हो व्हावें ४
अमृत ह्मणे ऐका बापा । ऐशी पंढरी हो देखा ५

२१

सकळ हो जन तुह्मीं मायबाप ।
आत्माराम एक पांडुरंग ॥ १ ॥
मज पामरासी काय थोर ज्ञान ।
नित्य वाचे बोलें नारायण ॥ २ ॥

आतां द्वैतभाव कांहीं नाहीं मनीं ।
एक सकळ जनीं पांडुरंग ॥ ३ ॥
अमृत ह्मणे ऐशी ओळखीली खूण ।
अंतरींचे गुण अंतरांत ॥ ४ ॥

२२

सकळ देवाचें दैवत । तोचि आम्रुचा मायबाप १
सर्व त्रिलोकीं नायक । सकळां ठायीं वसे देव
सकळ जीवांचा जो जीव । तो आम्रुचा पंढरीराव
अमृत ह्मणे ऐसा भाव । ओळखीला सत्य देव ४

२३

नमितों मी लहानथोरां । शुद्ध धर्म साधन करा
चारीवर्ण देवलोकां । सत्य धर्म बुडवूं नका २
किती सांगावें तुह्मांसी । पापकर्में जाळायासी ३
दुष्ट गुणीं रत झाला । अन्न मिळेना खायाला ४
अमृत ह्मणे भाव धरा । सद्गुरूचे चरण धरा ५

क्र. ३७७८

२४

पशु पक्षी तेही खरे । त्यांचे एक नेम खरे १
जन्मुनी मानवप्राणी । ओळख नाहीं आईबहिणी
स्त्री लग्नाची सोडुनी । इतर त्या आईबहिणी ३
कळेना हा नेम धर्म । पशु जाणावा तो पूर्ण ४
अमृत ह्मणे धर्म राखा । नका जाऊं अधःपाता

२५

देव दयाळू जगाचा । दाता सर्व पदार्थांचा १
आशा मनशा जीवां भारी । करी प्रपंचाची थोरी
धन विद्या संपादिती । अभिमान वाढविती ३
ऐसें ज्ञान झालें जगीं । कळेना ही भावभक्ती ४
मनीं कल्प वाढविती । नाहीं तेथें सत्य भक्ती ५
ह्मणुनियां शिक्षा केली । लक्षचौऱ्यांशीची फेरी
अमृत ह्मणे भाव धरा । संसारांत भक्ती करा ७

२६

कलियुगीं देव न भेटे । ऐसें बोलती करंटे १

देव असूनियां जवळी । नाहीं दिसे कदाकाळीं २
देव बोले देव चाले । वंदा तयाचीं पाऊलें ३
कपटी मनाचा जो काळा । देवकेंचा त्याचांडाळा
अमृत ह्मणे दृढ मन । वंदा सद्गुरुचरण ५

२७

भक्ती जगा दाखविती । पोटासाठीं साधू होती
दारोदारीं फिरुं लागले । वरकांती ढोंग केलें २
टाळ विणा घेउनि हातीं । मुखीं ईशनाम गाती
भिक्षा पोटातें मिळविती । सत्य देव विसरती ४
अमृत ह्मणे शोध करा । पाय सद्गुरूचे धरा ५

२८

मी निंदितों जगासी । तरी कां वंदितों सकळांसी
याचा करावा विचार । भाव धरावा सत्वर २
भ्रमें ज्ञानी भुलले सर्व । सत्य बुडविलें सारें ३
अमृत ह्मणे काय करूं । कोणी ओळखिला सद्गुरु

२९

चारी वेद चारी वर्ण। पवित्र धर्म पहा शोधुन १
असुनी देवाचें देव कूळ। कां हो होतां भ्रष्ट फार
सत्य नेम धर्म धरा। देवधर्मसाधन करा ३
अमृत ह्मणे शोध करा। पाय सद्गुरूचे धरा ४

३०

जे कां उपासानें मेले। त्यांत पुण्य काय झालें १
ह्मणे व्रत चालविलें। बहू दुःख आत्म्या दिलें २
आत्म्या नाहीं ओळखिलें। ह्मणे तीर्थ बहू केलें ३
बहू भूषणीं दाटला। सर्व जग फिरुनी आला ४
ऐसें भटकुन काय केलें। तेथें काय हो मिळालें ५
देव तुझा तुझेजवळी। व्यर्थ काया शिणविली ६
अमृत ह्मणे शोध करा। सद्गुरूचे चरण धरा ७

३१

कंदमुळें फळें भाजी। अवघी विठाबाई माझी १
केळीं नारळ पोफळ। अवघा भरला गोपाळ २

डाळ गूळ हे तांदूळ । हरी अखंड सकळ ३
दूध तूप अन्न पाणी । नारायण ध्यानीं मनीं ४
अमृत ह्मणे सत्य गुण । देव गुरु नाहीं दोन ५

३२

जन्मुनियां शुद्ध कुळीं । पडे विश्वमाये भुली १
परस्त्रीतें लावी चित्त । तेथें पापाचे पर्वत २
राखी आपुला तों प्राण । कापी बहूतांची मान
त्यानें आचार बुडविला । भ्रष्ट गुण सांठविला
पापी हाच जाणा पूर्ण । तेथें नाहीं हरीहर ५
अमृत ह्मणे सर्व लोकां । धर्मभ्रष्ट होऊं नका ६

३३

भावभक्ती नाहीं चित्तीं । तेथें कैंची ज्ञान मती १
दया धर्म नाहीं मनीं । पूजी आणिक देव जनीं २
ऐशियासी देव नाहीं । श्वान जाणावा निश्चयीं
अमृत ह्मणे भाव धरा । देव आपुलासा करा ४

३४

नरमादी मानव प्राणी । धन विषयांचे ज्ञानी १
देह क्षेत्र दिलें ज्यानें । नाम त्याचें नाहीं ध्यानीं
दानधर्म करितां पुण्य । बहुमानही भूषण ३
भ्रमें भुलला हा जीव । कळेनाही एक देव ४
अमृत ह्मणे सत्य गुरु । दया आह्मांवरी थोरू ५

३५

कुळाचा कुळ देव । अखंड वर्णूं त्याचें नांव १
कुळाची कुळदेवी । नित्य वंदूं तिचे पायीं २
दगड धोंडे ही माती । तीच आमुची माय सती
चक्रपाणी हरीहरू । आह्मीं तयाचें लेंकरूं ४
आतां पुजूं एक देव । आणिक नाहीं दुजा भाव
अमृत ह्मणे गुरुराव । सकळ देवांचाही देव ६

३६

मज आतां जगीं कांहीं नसे गोड ।
नारायण नाम प्रेम जोड ॥ १ ॥

लागली ही गोडी लांचावलें मन ।
सांवळें सगुण देखतांची ॥ २ ॥
सगुण निर्गुण अनाम अरूप ।
चित्तीं झालें एक द्वैत गेलें ॥ ३ ॥
सद्गुरूची कृपा आम्हांवरी झाली ।
हरीनें पाऊलें दाखविलीं ॥ ४ ॥
अमृत ह्मणे पाहूं जातां हरी नाहीं ।
वंदावे ते पाय सद्गुरूचे ॥ ५ ॥

३७

ऐका ऐका नरनारी । वाचे सरा हरी हरी १
तिन्ही देह शुद्ध करीं। पथ्यें आचरावीं बरीं २
राहूनियां चवथ्या घरीं । नित्य सत्य कर्म करीं
सुखा तेथें नाहीं उणें । जन्मोजन्मीं सुख घेणें
अमृत सांगे सत्य सत्य। शरण सद्गुरूसी नित्य

३८

गुरु तोचि सत्य देव । ऐसा धरी प्रेमभाव १

प्रेम तोचि परमेश्वर । विश्वासी तो ईश्वर २
ऐसा भाव धरीं देहीं । आणिक पाहूं नको कांहीं
सत्य चित्तामध्यें ठेवीं । नाम नारायण गाईं ४
मज पामरा दुजें नसे ज्ञान । वैकुंठीं नेई नारायण ५
अमृत ह्मणे सत्य मन । वंदीं सद्गुरुचरण ६

३९

प्राणी हीन दीन झाला । मायामोहें गुंग झाला
सांडुनियां सत्य गूळ । विष पितात सकळ २
जें जें करी तें तें दुःख । मग तेथें कैंचें सुख ३
सर्व सुख रामनामीं । परि तें न घेती खळ दुष्ट ४
अमृत ह्मणे भक्तिभावें । अखंडित सुख आहे ५

४०

नमितों मी लहानथोरां । सांगतों हें ध्यानीं धरा
ऐशी साधावी ती युक्ती । धन सांपडेल भक्तीं
यासी उपाय तो बरा । पाय सद्गुरूचे धरा ३
देहरूप मळ सारा । आंत आत्माराम हिरा ४

अमृत ह्मणे पापगुणें। भुले आपणा आपण ५

४१

वैकुंठींचा राजा । बाप नारायण माझा ॥ १ ॥
नाम गाऊं तया पाहूं । हेंचि सुख आह्मां बहू
एक पुजा सत्य भाव । राम कृष्ण महादेव ३
तिन्हीं लोकीं भरला जीव । त्यावेगळा तो देव
अमृत ह्मणे सत्य गुरु। हाचि एक हरीहरू ५

४२

हेंचि मागतों देवासी । चरण दाखवीं आह्मांसी
नित्य संतांची संगती । रामनाम गाऊं चित्तीं
साधुसज्जनांचें धन । सदा देवाचें भजन ॥३॥
अमृत ह्मणे सत्य गुरु। हाचि देव आह्मां थोरू

४३

निवृत्ति सोपान मुक्ताबाई। हेचि संत वंदू पाहीं
ज्ञानदेव व्यासमुनी । सत्य भक्त हेचि जनीं २
विश्वामित्र तपाचारी । वशिष्ठ ब्रह्मऋषी भारी

नामदेव तोचि तुका । आह्मां मायबाप सखा ४
पद्मनाभपद खरा । चारी वर्णां गुरू बरा ५
अमृत संतांचें लेंकरूं । दास चरणांचा पामरू ६

४४

गंगापुत्र भीष्माचार्य । मारुती बाळ ब्रह्म थोर
कार्तिक स्त्रीत्याग करी । सुख त्याचे बरोबरी
ब्रह्म नमियेलें चारी । वाल्मिक रामजप करी ३
ध्रुव सत्य नाम जपे । अखंड पद त्यासी प्राप्त
प्रल्हादाचा नारायण । यज्ञ हाचि निर्वाण ५
अमृत ह्मणे खरोखर । संत देवाहून थोर ॥६॥

४५

राजा एक हरिश्चंद्र । सत्वगुणी पांडुरंग ॥ १ ॥
विक्रम दया धर्म पाळी । जरा पुत्र ह्मणुनि सांभाळी
दशरथ वर्णूं थोरी । राम आले त्याचे घरीं ३
अर्जुनादि पांडव क्षत्रिय । कृष्ण तयाबरोबरी ४
अमृत ह्मणे भक्ति थोर । देव भक्ताबरोबर ५

४६

सांगतों हे माय बहिणी । भावें लागा पतीचरणीं
हाचि जाणावा देव । सत्यधर्मीं धरा भाव २
सुखा तेथें नाहीं पार । तीर्थ-व्रत अपार ॥ ३ ॥
पुत्र धन धान्य मिळे । पतिवचन पाळुनियां ४
अमृत ह्मणे जाणा पाहीं । पतिव्रता हो निश्चयी

४७

पदीं नमितों पद्मनाभा । हाचि नारायण माझा
ऐसा नेमधर्म आह्मां । एक नारायण नेमा २
सर्व वेद शास्त्र पुराण । एक सत्य चित्तीं नाम
अमृत ह्मणे भाव धरा । निश्चयानें भक्ती करा

४८

हारपली ज्ञानमती । एक नाम सदा चित्तीं १
धांव पाव नारायणा । चरण दाखवीं सज्जनां २
मज नाहीं हातपाय । आतां तूंच बापमाय ३
मज नाहीं जीभवाचा । बोली बोलें विश्वताता

क्र. ३९७०
मज नाहीं डोळे कान । देखे ऐके नारायण ५
अमृत ह्मणे सत्य मन । नमूं सद्गुरुचरण ६

४९

मायबाप देवधनी । आह्मां जन्मविलें त्यानें १
आतां हेंचि पुजूं जनीं । राजाराणी वंदूं दोन्ही
राज्यकर्ते बंधू ज्ञानी । थोर पुण्यवंत जनीं ३
अमृत ह्मणे सत्यगुरु । आमचा मायबाप थोरु

५०

सद्गुरू सत्य नारायण । मुखीं पद्मनाभ जाण १
त्याचे पूर्ण कृपेपासुन । झालें देहाचें साधन
सदा राही ध्यानीं भरून । नाम गाई परीपूर्ण
आतां झालों मी अमर । कधीं नाहीं येरझार
अमृत ह्मणे पूर्ण भाव । झाला गुरुचरणीं ठाव

५१

अक्षरांची अटाअटी । केली धनद्रव्यासाठीं १

पांडुरंग जगजेठी । कोणी न घे त्याची भेटी २
ज्ञान कळा परोपरी । पोट भरे नाहीं तरी ३
जीव एकमेकां खाती । पोट भरण्याची ही मती
भाऊ भावाचे वैरी । वाद होती घरोघरीं ५
अमृत ह्मणे ऐसे जन । कळेना सत्य ज्ञान ६

५२

जोडियेलें थोर पुण्य । जन ह्मणताती धन्य १
धन्य त्याची मातापिता । कुळ उद्धरिलें स्वतां २
धन ज्ञान विद्याप्राप्ती । अभिमान नाहीं चित्तीं
कला कौशल्याही मती । दया सकळ जगतीं
देव ऐशियाच्या घरीं । विघ्नें आलीं तीं निवारी
अमृत ह्मणे पुण्य जोडा । पापकर्मे अवघीं सोडा

५३

मूळ निर्गुण सगुण । जग निर्मियेलें त्यानें १
देव संत एक हरी । दया आह्मां बाळांवरी २
वेद शास्त्रेंही पुराणें । सत्य संतांचीं वचनें ३

जीं जीं ऐकिलीं कानीं । तीं तीं देखिलीं नयनीं
अमृत ह्मणे होउनि लीन । धरूं सद्गुरुचरण ५

५४

जडमूढ जीवांसाठीं । तुकाराम आले भेटी १
गुप्त राहुनियां बोले । सत्य बोल हे निर्मळ २
कपट सांडुनी कल्पना । संत ओळखा सज्जना
अमृत सांगे सत्य खुणा । तुका मायबाप जना

५५

वाघ सिंह सर्प विंचू । रीस पांचवा तो पशू १
पशुपक्षियांच्या कुळीं । गरुड ऐरावती बळी २
दोन पांच सात बळी । नक्र आठवा तो जळीं ३
गेले ऐशियाच्या गांवा । सुख घ्यावया विसांवा
अमृत ह्मणे थोरपणें । नागविले याचि गुणें ५

५६

धन्य पुण्याचे पर्वत । सज्जन हे भाग्यवंत १
संत असंत हे दोन्ही । आह्मां एकचि प्रमाणी

सोन्या लागला हा डाग । तोचि कलंक तयास
जैसा हिरा हिरकणी । तैशापरी नरनारी ४
पाप करीताती प्राणी । तेव्हां दुःख जन्मोजन्मीं
अमृत ह्मणे पुण्य करा । पाय सद्गुरूचे धरा ६

पदें.

गड्यांनो भुलूं नका तुह्मीं भुलूं नका । करुनि
घ्या विश्वनाथ हा सखा ॥ ध्रु ॥

सांडुनी कुकर्माची रीती । सत्यकर्में धरावीं
चित्तीं । पहा लक्ष्मीचा पती ॥ गड्यांनो १
भक्ति भाव प्रेम धरा । शरण जावें त्या ईश्वरा ।
ऐसी बुद्धी धरा चित्तीं ॥ गड्यांनो ॥ २ ॥
दया धर्म नेम करा । ओळखुन घ्यावें त्या ईश्वरा ।
वाचे राम नाम स्मरा ॥ गड्यांनो ॥ ३ ॥
अमृत बोले हें सत्वर । खरोखर सद्गुरूच्या बळें ।
लक्ष ठेउनि चरणांवर ॥ गड्यांनो ॥ ४ ॥

## आरती.

आरती सद्गुरुनाथा । दीन दयाळू दाता ॥आ.॥
आज केली आरती । धन्य धरित्रीमाता ॥आ.॥
भावें केली आरती । जगदीश ईशताता ॥आ.॥
ब्रह्मा विष्णू शिवमूर्ती । एक नारायण चित्तीं
रामकृष्ण हरिहर । तीर्थी तीर्थीं तोचि दाता ॥
आत्मा तोचि जीवशीव । हाचि ओळखा देव ॥
चित्ता ॥ आ. ॥
बाळ अमृतें केली आरती । सत्य भाव धरुनी
चित्ता । आरती सद्गुरुनाथा । दीन दयाळू दाता

समाप्त.

REFBK-0003170
REFBK-0003170
दा. क्र. 3960

